जिल्हा परिषद सेवेतील गट-क च्या
कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतनश्रेण्या
मंजूर करणेबाबत
<u>ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी</u>

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांकः डिएसआर-२०१३/प्र.क्र.३०/आस्था-०५

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
तारीख: ९ सप्टेंबर, २०१४

<u>वाचा :-</u>

1) **शासन निर्णय क्रमांकः ग्रा.वि.वज.सं.वि.क्र.डिएसआर-२००८/प्र.क्र.८०/आस्था-५, दि.२३/९/२००८**
2) **शासन निर्णय क्रमांकः ग्रा.वि.वज.सं.वि.क्र.डिएसआर-२००९/प्र.क्र.६१/आस्था-५,दि.२०/५/२००९**
3) **शासन निर्णय क्रमांकः वित्त विभाग -वेपुर-१२१२/प्र.क्र.३१/सेवा-९, दि. ११/०२/२०१३**

**शासन निर्णय:-**

उपरोक्त अ.क्र.२ येथील दि. २०/५/२००९ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेतील जिल्हा सेवा, वर्ग-३ मधील जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग-३ व जिल्हा सेवा, वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांसाठी दि.१/१/२००६ पासून सुधारित वेतनश्रेणी देण्यात आली आहे. त्यानुसार ग्रामसेवक संवर्गास रु.५२००-२०२०० अधिक ग्रेडवेतन रु.२४०० आणि ७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर रु.५२००-२०२०० अधिक ग्रेडवेतन रु.२८०० व ग्रामविकास अधिकारी संवर्गास रु.५२००-२०२०० अधिक ग्रेडवेतन रु.२८०० ही वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे.

२. ग्रामसेवक या संवर्गास ७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर पदनाम तेच ठेवून दि.२३.०९.२००८ च्या शासन निर्णयान्वये रु.४५००-७००० ही वेतनश्रेणी आणि ६व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दि.२०.०५.२००९ अन्वये रु.२८०० इतके ग्रेडवेतन सध्या देण्यात येत आहे. सदर तरतूद या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहे. ७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर यापुढे देण्यात आलेली वेतनश्रेणी रद्द केल्यामुळे यापूर्वी ज्या कर्मचाऱ्यांना याचा लाभ देण्यात आला आहे तो वसूल करण्यात येवू नये.

३. या शासन निर्णयानुसार ग्रामविकास अधिकारी या संवर्गास वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० + ग्रेड वेतन रु.३५००/- ही वेतनसंरचना मंजूर करण्यात येत आहे

४. ही सुधारणा दि.१.१०.२०१४ पासून लागू करण्यात यावी. तसेच प्रस्तुत प्रमाणे वेतन सुधारित केल्याने होणाऱ्या अतिरिक्त खर्चास प्रत्यक्ष विधीमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर व तद्नुसार तरतूद झाल्यानंतरच निधी वितरीत करणेत यावा.

५. वरील वेतन सुधारण्यामुळे होणारा अतिरिक्त खर्च ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशीर्षाखालीच खर्ची टाकण्यात यावा.

६. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २५७/२०१४/सेवा-९ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०९०६१८२७१३०४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SHINDE VIJAY DATTATRAYA

Digitally signed by SHINDE VIJAY DATTATRAYA
DN: CN = SHINDE VIJAY DATTATRAYA, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GAD,CID - 917064
Reason: I am approving this document
Date: 2014.09.09 19:08:44 +05'30'

**(वि.द.शिंदे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य,१ व २ (मुंबई/नागपूर) (पाच जादा प्रतींसह)
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य,१ व २ (मुंबई/नागपूर) (पाच जादा प्रतींसह)
७. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई
८. उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/नागपूर
९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
११.निवडनस्ती (कार्यासन-आस्था-०५).